# बृहन्मुंबई महानगरपालिका

घकव्य, जी/दक्षिण, ना. म. जोशी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - 400013.

क्र. स.अ.(घ.क.व्य.)जी.द./2308/एस.आर. दिनांक 08.12.2025

## "स्वारस्य अभिव्यक्ती" (E.O.I.)
## सेवाभावी संस्थांमार्फत कामगार पुरवठा करण्यासंबंधी सूचना

जी/दक्षिण विभागातील सर्व नोंदणीकृत सेवाभावी संस्थांना कळविण्यात येत आहे की, **जी/दक्षिण विभाग कार्यालयातील आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाकरीता हाऊसकिपिंगची कामे करण्यासाठी** 100 दिवसांच्या कालावधीकरीता सकाळ/दुपार पाळीत मागणी नुसार कामगार पुरविण्याकरीता खालील अटी व शर्तीनुसार विभागातील ईच्छुक स्थानिक नोंदणीकृत सेवाभावी संस्थांनी सहाय्यक अभियंता (घकव्य) जी/दक्षिण विभाग, दुसरा मजला, जी/दक्षिण विभाग कार्यालय, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, मुंबई - 400013 यांच्या नावे नोंदणी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती सहीत दि.10/12/2025 रोजी दु.1.00 वाजेपर्यंत अर्ज करावेत. सदर तारखे नंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही. अधिक माहितीसाठी कार्यालयाशी संपर्क साधावा.

अटी व शर्ती :-

1. जी/दक्षिण विभागातील नोंदणीकृत असलेल्या संस्थांनीच त्यांच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नोंदणी असलेल्या वेंडर कोड व ई-मेल आय-डी सहीत विषयांकीत काम मिळण्याकरीता अर्ज करावेत.
2. विषयांकीत स्वरुपाच्या कामाकरीता पात्र संस्थांमधून सोडत काढून आवश्यक एका संस्थेची निवड करण्यात येईल.
3. आठ तासांच्या सकाळ / दुपार पाळीमध्ये आवश्यकते व सूचनेनुसार जी/दक्षिण विभागात कामगारांचा पुरवठा करणे नियुक्त संस्थेस बंधनकारक राहील.
4. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सद्य प्रचलित किमान वेतन धोरणानुसार वेतनाचे अधिदान रु.792.30 प्रतिदिन / प्रति कामगार (लेव्ही वगळून) या दराने राहील.
5. विषयांकीत कामासाठी आवश्यक लागणारे साहित्य, अवजारे तसेच कामगारांस आवश्यक सुरक्षा उपकरणे/साधने पुरविण्यास संस्था बंधनकारक राहील.
6. अयोग्य अर्ज कोणताही पत्र व्यवहार न करता फेटाळण्याचे तसेच विषयांकीत कामाचा कालावधी तथा मनुष्यबळाची संख्या ही परिस्थितीनुसार कमी-अधिक करण्याचा तथा सदर कामास स्थगिती देण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग ह्यांचे राहतील.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण**